राज्यातील अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन निर्णय क्रमांकः नियुक्ती २०११/ प्रक्र ३४४/११/मशि ५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०११

**वाचा :-** १) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००९/(४३५/०९)/विशि-३, दिनांक ३० जानेवारी,२०१०

**प्रस्तावना :-** मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक - २२१६/२००६ मध्ये दि.३.१२.२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यासाठी विहीत मुदत निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार प्राचार्यांची पदे विहीत मुदतीत भरण्याबाबत संदर्भाधीन दि.३० जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयान्वये महाविद्यालयांना आदेश देण्यात आले होते. त्यात संबंधित शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनांनी प्राचार्यांची नियुक्ती करण्यामध्ये येणा-या अडचणी वेळोवेळी मा.न्यायालयासमोर मांडल्यानंतर न्यायालयाने मुदतवाढ दिलेली होती. त्यानंतर संदर्भाधीन शासन निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात काही विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सदर विशेष अनुमती याचिकांच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. २८ मार्च, २०११ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दिनांक ०३/१२/२००८ रोजी दिलेले आदेश रद्द करुन प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रीया कायद्यानुसार सुरु ठेवावी आणि ती वेगाने पूर्ण करावी असेही आदेश दिले आहेत.

२. राष्ट्रीय ज्ञान आयोग, प्रा.यशपाल समिती व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय यांनी गेल्या काही वर्षात सातत्याने उच्च शिक्षणातील गुणवत्तेवर कटाक्षाने भर दिलेला असून त्यामध्ये प्रामुख्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या विनियमानुसार अर्हताधारक (Qualified), मान्यता प्राप्त (Approved) व नियमित (Regular) अध्यापकांच्या नियुक्त्यांचा आग्रह धरलेला आहे.

३. वर नमूद केल्यानुसार मा.उच्च न्यायालय, केंद्र शासन व राज्य शासनाचे आदेश असतानाही तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा प्राचार्याची रिक्त पदे भरती नियमानुसार व तातडीने पूर्ण करावी असे आदेश दिल्यानंतरही काही शैक्षणिक संस्था प्राचार्यांची रिक्त पदे नियमितरित्या भरण्याची प्रक्रीया शीघ्रतेने न राबविता सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अर्हताप्राप्त नसलेल्या अध्यापकाकडे प्रदीर्घ काळासाठी देऊन कामकाज चालवत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. म्हणून ज्या महाविद्यालयामध्ये प्राचार्यांचे पद नियमित स्वरुपात भरलेले नसेल अशा ठिकाणी अतिरिक्त कार्यभार देताना कोणत्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा या संदर्भात आवश्यक आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

**शासन निर्णय :**

१. प्रस्तावनेच्या परि.२ मध्ये विषद केलेली बाब विचारात घेता, ज्या महाविद्यालयामध्ये प्राचार्याचे पद नियमितरित्या भरलेले नाही त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देताना पुढील प्रमाणे अवलंब करावा :-

१) ज्या अध्यापकाने पी.एच.डी. पदवी धारण केलेली आहे, पदव्युत्तर स्तरावरील परिक्षेत त्याने किमान ५५ टक्के गुण प्राप्त केलेले आहेत व १५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आहे अशा अध्यापकास तात्पुरत्या स्वरुपात तथापि १ वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी अतिरिक्त कार्यभार देण्यात यावा.

२) अतिरिक्त कार्यभार हा जेष्ठतेनुसार द्यावा यासंबंधी विविक्षित नियम नसले तरी प्रघाताने तो जेष्ठतेतम पात्र कर्मचा-याला दिला जातो त्याचा अवलंब करावा.

३) अपवादात्मक परिस्थितीत ज्या महाविद्यालयामध्ये वरील १) येथील अर्हता धारण केलेले अध्यापक उपलब्ध नसतील तर आणि वरील निकष शिथिल करण्यासाठी संबंधित संस्थेने प्रस्ताव संबंधित सह संचालक, उच्च शिक्षण यांचेकडे ज्येष्ठता विचारात घेऊन पाठवावा व सह संचालकांनी केवळ अध्यापन अनुभवाच्या १५ वर्षाच्या अटीमध्ये यथास्थिती ३ वर्षपर्यंत शिथिलता द्यावी मात्र, अध्यापनाचा १२ वर्षापेक्षा कमी असलेला अनुभव मान्य करु नये.

२.	या शासन निर्णयापूर्वी जर एखाद्या महाविद्यालयात आवश्यक अर्हता धारण "न" करणाऱ्या अध्यापकाकडे प्राचार्य पदाचा कार्यभार सोपविला असेल तर त्या ठिकाणीही या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

हे आदेश, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०१३१७२०३५००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(सदाशिव शिवदास)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय सहसंचालक,(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य.
सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
मशि / विशिं तील सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती :- मशि ५

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
(संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९३२९४, २६९१५३३ व २६९२३३३.

संदर्भ : जा.क्र./संलग्नता/टे.१/युजीके/ 379		दिनांक : 28 DEC 2011

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,